पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail**: prospoffice.gadchiroli@gmail.com

# -: वार्तापत्र :-

दिनांक २२/०८/२०२०

## पोलीस पाटीलास मारहान करणाऱ्या आरोपीस ३ वर्ष कारावास व ५,०००/- रु. दंड

### => मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश -२ श्री. दे.ग. कांबळे यांचे न्यायालयाचा न्यायनिवाडा

आरोपी नामे विलास गोविंदा धनकर वय ५० वर्ष रा. वैरागड ता. आरमोरी याने दिनांक २१/११/२०१७ रोजी मौजा वैरागड गावातील पोलीस पाटीलास तु माझा नाव पोलीसांना का सांगीतलास असे म्हणुन शिवीगाळ करुन त्यांना मारहान केली फिर्यादीने त्यास कशाला मारत आहेस असा म्हणाला असता आरोपीने नालीतील दगळ उचलुन फिर्यादवर फेकुन मारल्याने त्यांच्या उजव्या हाताला व छातीवर मार लागुन दुखापत झाली तसेच कुशाल सावरकर हे तिथे आल्याने त्यांना सुध्दा आरोपीने दगळ फेकुन मारल्याने त्यांच्या डोक्याला मार लागुन दुखापत झाली त्यामुळे फिर्यादीने पोस्टे आरमोरी येथे सदर आरोपी विरोधात रिपोर्ट दिली.

फिर्यादीचे तक्रार वरुन पोस्टे आरमोरी येथे अप क्र. ३६२/२०१७ कलम ३५३, ३२४, २९४, ५०६ भादवी अन्वये गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उप निरीक्षक डि बी इरपाते यांनी तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. सरकार तर्फे फिर्यादी व इतर साक्षीदारांचे बयाण व वैद्यकीय अधिकारी यांचे अभिप्राय तसेच सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरुन दिनांक २०/०८/२०२० रोजी आरोपी यास मा. श्री. दे.ग. कांबळे जिल्हा व सत्र न्यायाधीश-२ गडचिरोली यांनी ३२४ भादवी अन्वये आरोपीस तीन वर्ष कारावास व ५,०००/- रु दंडाची शिक्षा सुनावली.

सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन.एम. भांडेकर त्याचप्रमाणे कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोनि/प्रकाश तुनकलवार यांनी काम पाहिले.